VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

ADAT VYAS EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | तुझे आहे तुजपाशी : एक नाट्यावलोकन<br>**प्रा. नीरज बोरसे** | १-३ |
| २ | पु. ल. देशपांडे यांचे व्यक्तिचित्रणात्मक लेखन<br>**दत्तात्रय त्रिंबक भानुसे** | ४-७ |
| ३ | प्रातिनिधिक स्वरूपाचे नमुने : 'व्यक्ती आणि वल्ली'<br>**डॉ. युवराज धबडगे** | ८-१० |
| ४ | पु. ल. देशपांडे यांच्या विनोदी लेखणाची चिकित्सा<br>**डॉ. यशोद श्रीमंतराव पाटील** | ११-१३ |
| ५ | पु. ल. देशपांडे यांच्या साहित्यातील विनोद : विशेष संदर्भ असा मी आसामी<br>**प्रा. डॉ. मारोती गायकवाड** | १४-१९ |
| ६ | अर्थभिन्नत्वातून पुलचे विनोद<br>डॉ. विठ्ठल जंबाले | २०-२३ |
| ७ | भाई व्यक्ती की वल्ली : माध्यमांतर समीक्षा<br>**प्रा. डॉ. दत्तात्रय प्र. डुंबरे** | २४-२८ |
| ८ | पु. ल. च्या साहित्यातील वाङमयीन मूल्यात्मकता<br>**डॉ. कैलास इंगळे** | २९-३३ |
| ९ | पु. ल. देशपांडे: व्यक्ती आणि वाङ्मय<br>**प्रा. संदीप परदेशी**<br>**डॉ. गणेश मोहिते** | ३४-३७ |
| १० | पु. ल. देशपांडे यांचे प्रवासवर्ण लेखन<br>**प्रा. डॉ. शिल्पा म्हात्रे - काकडे** | ३८-४१ |
| ११ | पु. ल. देशपांडे यांचे कथालेखन<br>**सहा. प्रा. रा. ज. चाटे** | ४२-४४ |
| १२ | पु. ल. देशपांडे यांचे साहित्य व कलाक्षेत्रातील योगदान<br>**डॉ. राखी सिद्राम सलगर** | ४५-४७ |





**Dr. Anil Chidrawar**
**I/C Principal**
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ६. अर्थभिन्नत्वातून पुलचे विनोद

**डॉ. विठ्ठल जंबाले**
सदस्य, मराठी अभ्यास मंडळ आणि सदस्य, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, देगलूर महाविद्यालय देगलूर, जि. नांदेड.

मराठी साहित्य विश्वात पुल या नावाने सुपरिचित असे लेखक म्हणजे पु.ल. देशपांडे. त्यांचे पूर्ण नाव पुरुषोत्तम लक्ष्मणराव देशपांडे. त्यांचा जन्म १९१९ मध्ये झाला. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर विविध सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होत आहेत. शाळा महाविद्यालयीन स्तरावर कार्यशाळांचे आयोजन करण्यात येत आहे. चर्चासत्र घेण्यात येत आहेत. अशाच एका चर्चासत्राच्या औचित्याने प्रस्तुत शोधालेख सादर करण्यात येत आहे.

महाराष्ट्राच्या सारस्वतामध्ये पुलनी अनमोल असे योगदान दिले आहे. बहुविध वाङ्मय प्रकारातून विनोदाचा खजिना निर्माण केला. साहित्यक्षेत्रात विनोदी लेखक व नाटककार म्हणून विशेष स्थान निर्माण झाले. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी मराठीत सुरू केलेली विनोद लेखन परंपरा राम गणेश गडकरी आणि आचार्य अत्रे यांनी आणि त्यांच्यानंतर पु.ल. देशपांडे यांनी समर्थपणे सांभाळली. त्यांच्या एकूण कारकिर्दीत लोकनाटय - नाटक, एकांकिका, लेख, पटकथा, चित्रपट, कथा, कादंबरी, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, कविता इत्यादी अष्टपैलू आविष्कार घडविला. पुलच्या प्रत्येक आविष्कारामधून हास्यतुषार निर्माण करण्याची किमया आवतीर्ण झाली. कारण प्रत्येक आविष्काराचा-निर्मितीचा अंगभूत गुणधर्म विनोद हाच होता.

सामान्य माणसांना त्यांनी असलेल्या भावस्थितीतून - मनस्थितीतून बाहेर काढून हास्यकल्लोळ निर्माण करण्याचे सामर्थ्य विनोदी लेखनामध्ये असते. म्हणून सामान्य - अतिसामान्य माणसाला खळखळून-खदखदून हसविण्याचे सामर्थ्य ज्या लेखनामध्ये असते, त्या लेखनाला पर्यायाने साहित्याला विनोदी साहित्य संबोधने योग्य आहे. पुलंची समग्र साहित्य संपदा विनोद निर्मितीची झालर घेऊन निर्माण झालेली आहे. विनोद हा त्यांच्या लेखनाचा मूलाधार आहे की, त्यांच्या सहजाविष्कारामधून आपोआप विनोदाचे पाझर फुटलेले आहेत. विनोदनिर्झर स्वाभाविकपणे प्रवाहित झालेले आहेत. विरोध, उपहास, उपरोध, विसंगती, अर्थभिन्नत्व या बाबी व्यंग्य टिपण्यामधून विनोदाचा खजिना साकारतो. नेमके तेच मर्म पुलच्या लेखनात कसे आढळते, यांचा वेध प्रस्तुत वेच्यात घेण्यात येत आहे.

मानवी जीवनातील अथवा स्वभावातील विसंगती त्यांनी विनोद निर्मितीसाठी मार्मिकपणे योजली. रविवारची कहानी, बिगरी ते मॅट्रिक, मुंबईकर, पुणेकर की नागपूरकर.. , म्हैस, मी आणि माझा शत्रुपक्ष, पाळीव प्राणी, काही नवे ग्रहप्रयोग, माझे पौष्टिक जीवन, टरला सुरला इ. विनोदी लेखनातील ठळक बाबींचा निर्देश करता येतो. वंदे मातरम्, दूधभात, गुळाचा गणपती या चित्रपटातून पुलंच्या अष्टपैलू कामगिरीचे दर्शन घडते. मराठी साहित्य- संगीत क्षेत्रातील त्यांचे योगदान आणि आकाशवाणी,

दूरदर्शन, क्षेत्रातील कार्य लक्षणीय आहे. त्यांनी लेखक, अभिनेते, नाटककार म्हणून कारकिर्दीची सुरूवात केली असली तरी ते सर्वत्र विनोदी संचार घडविले.

Dist.Nanded

**अर्थभिन्नत्वातून विनोद निर्मिती**

शब्दरुप एकच असताना त्याच्याशी जोडून मागे किंवा पुढे जे संदर्भ येतात, त्यावरून अर्थातील वेगळेपण लक्षात घ्यावे लागते. उदा. केस, साल, माळ, कळ, सुमन, भाडे, पळ यासारखे असंख्य शब्द अथवा कित्येक वाक्य संदर्भाधिष्ठित अर्थ प्रत्यय देणारे असतात. भाषाशास्त्रातील आरोह, अवरोह, विराम, संधी, बलाघात यांचे उच्चारणातील अस्तित्व ऐकणाऱ्यांना आणि लेखनातील विशिष्ट संकेत लिपिचिन्हे लक्षात घेऊन वाचताना विनोद अनुभवास येतो. अशा प्रातिनिधिक संदर्भांचा मागोवा खालीलप्रमाणे-

१. त्यांच्या ओळखीच्या एका मुलीचे लग्न ठरले. माहेरचे आणि सासरचे आडनाव एकच होते. हे कळल्यावर पु.ल. म्हणाले, "बाकी म्हणा, पण मुलीने घराण्याचे ' नाव' राखले हो!"

प्रस्तुत संदर्भात नाव या शब्दाचे संदर्भनिष्ठ भिन्नार्थ विनोद निर्माण करण्यासाठी आलेले आहेत.

२. एका आजारात पु.ल.ची दोन्ही पावलं सुजून गुबगुबीत दिसत होती. त्यावेळी भेटायला आलेल्या एका मित्राला आपल्या सुजलेल्या पायाकडे बोट दाखवित पु.ल. म्हणाले, ! "हे माझे पाय बघ म्हणजे तुला कळेल, पायाला हिंदीत 'पाव' का म्हणतात ते !" पाव या शब्द योजनेमधून अर्थाच्या अनेक छटा विनोद- हास्य कशारितीने उत्पन्न करतात, हे पु.ल.च्या विनोदामधून अनुभवास येते.

३. पु.ल. ची पावलं मोठी होती. त्याबद्दल ते लिहितात," शरीररचना करताना बहुधा देहविस्ताराचा विचार करून देवानं आधीच चांगली भरभक्कम पायाभरणी केली असावी." येथे पुलनी निसर्गदत्त पाय मोठे असणे याची थेट पायाभरणीशी तुलना करणे, हास्यफवारे उडविणारे ठरते.

4. पं. सी.आर. व्यास यांच्या सत्काराचा कार्यक्रम मुंबईत होता. पु.ल. कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. पु.ल. उभे राहिले. व्यास यांच्याकडे पाहत म्हणाले, " आजवर अनेक व्यासपीठावरून मी भाषणं केली असली तरी हे 'व्यास' पीठ मला न झेपणारे आहे."

माहेरचा जुना अंक वाचताना , भारती आचरेकरांची मुलाखत वाचली. त्यात त्या म्हणतात, त्यांची आई माणिक वर्मा ह्यांच लग्न ठरल्याची बातमी कळल्यावर पु.ल. पटकन म्हणाले," हिने तर वर्मावरच घाव घातला!"

व्यास आणि वर्मा या आडनावरून केलेल्या कोटया शब्दरूप सारखे असूनही संदर्भनिहाय अर्थप्रकटीकरणासाठी उचित ठरलेल्या आहेत.

५. पु.ल.च्या हजरजबाबीच्या कथा-

आनंदवनातील ग्रामभोजनात विविध क्षेत्रातील मातब्बर मंडळी सहभागी होते. मधूनच ते उठले व तो सुखसोहळा कॅमेऱ्यात बंद करून परत येऊन पाहतात, तर त्यांच पानं गेलेलं पाहून हयांची शोधक नजर पुल लगेच उद्‌गारले, 'मुकंदराव, इथं संपादकीय पान नाहीय' जेवणांचं पानं आणि संपादकीय पान यामधील पानं हा शब्द असूनही त्यांचा अर्थ बदल संदर्भानिष्ठ आहे. तो वाचकांना विनोद अनुभूतीस पुरक ठरलेला दिसतो.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हिंदुजा हॉस्पीटलमध्ये दाखल झाले. ते ऐकताच पु.ल. उद्‌गारले,"त्यांच्या खोलीच्या दरवाजावर आता 'गर्व से कहो हम ' हिंदुजा ' मे है' असं लिहायला हरकत नाही !"

एकदा एका समारंभात पु.ल.च्या शेजारी श्री ना.ग.गोरे आणि दुसऱ्या बाजूला श्री भुजंगराव कुलकर्णी बसले होते. पु.ल. म्हणाले," आफतच आहे, एकोकडे ' नाग ' आहे, तर दुसरीकडे ' भुजंग '!" नाग आणि भुजंग या समानार्थी शब्दाचा वापर समकालीन घटनांशी जोडून विनोद साधला आहे.

एका शाळेमध्ये पु.ल.ना बोलावून सत्कार करण्यात आला. पु.ल. दिलेल्या खुर्चावर बसताच खुर्चीचा हात मोडला. सगळी पोरं खो खो हसली. ओशाळलेले प्रिंसीपल म्हणाले, " माफ करा पण हजारवेळा सांगूनही इकडच्या सुतारांकडून नीट काम होत नाही. " पुल मिश्किलित म्हणाले, " अहो ' करवत ' नसेल !" याठिकाणी करवत या शब्दाचे भिन्नार्थ विनोद निर्मितीसाठी पुरक ठरले आहेत.

" मुलगी अगर मुलगा सरळ वळणाची अगर वळणाचा कसा असतो कोण जाणे. कारण वळण म्हटल्यावर सरळ कसे असणार. भूमितीला बुचकळयात ढकलणारी ही सरळ वळणाची आडवळणी व्याख्या आहे!" वळण याशब्दातील अनेकार्थता पुलच्या विनोदाला अधिक खुमासदार बनविते. समकालीन वास्तवचित्र अधोरेखित करण्यासाठी उपयुक्त ठरते.

गप्पांच्या ओघात पुलं एकदा म्हणाले, " मामा यानावाची गंमत आहे, त्याला शकुनी म्हणावं तरी पंचाईत आणि अपशकुनी म्हणावं तरी पंचाईत !" मामाच्या वृत्ती- प्रवृत्तींचा येथे घेतलेला खरपूस समाचार नात्यातील विसंगती मार्मिकतेने प्रकट करतो.

पुलची विनोददृष्टी साहित्यसृष्टीतील सौंदर्य वृद्धिंगत करण्यासाठी उपयुक्त ठरलेली आहे. निसर्ग आणि मानव, सृष्टी आणि समष्टीशी अनुबंध प्रकट करणारी आहे. म्हणूनच पुलचे साहित्य त्रिकालबाधित सत्य कथन करणारे आणि विनोद निर्मितीचा खजिना ठरणारे आहे. म्हणूनच पुल हे आधुनिक मराठी साहित्यातील अनमोल शब्दरत्नांच्या खाणी तयार करणारे साहित्यसम्राट ठरतात. याबद्दल मराठी अभ्यासकांमध्ये किंतू असण्याचे कारणच नाही. पुलचे विनोद म्हणजे मराठी साहित्यावर चढलेली आभुषणे आहेत.

पु.ल.ची पुस्तकांची नावे, पुस्तकामधील संवाद विनोदनिर्मितीची साक्ष देणारे आहेत. चित्रपटांची नावे आणि संवाद हा विनोदाचा अविभाज्य भाग आहेत. उदा. अघळपघळ, वाऱ्यावरची वरात, बटाटयाची चाळ, असा मी असामी, खोगीरभरती, पुढारी पहिजे, उरलंसुरलं, वटवट वटवट इ. पुस्तकांची नावे तथा संवाद विनोदाची प्रचिती देतात. म्हणूनच पुलना मराठी साहित्यामध्ये वैविध्यपूर्ण योगदान चिरंतनत्व व लोकप्रियता मराठी वाचकांना आकर्षित करते.

**संदर्भग्रंथ**

१. तुषार बोडखे- पु.ल. देशपांडे यांचे निवडक विनोद
२. पु.ल. प्रेम : पु.ल.चे काही किस्से
३. पु.ल. चे मजेदार विनोद- रेणुकादास देशपांडे.
४. पुरूषोत्तम लक्ष्मणराव देशपांडे - विकिपिडिया

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded